माऊली बहुउद्देशिय संस्था, अकोला संचलित माऊली विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, सोमठाणा, ता.जि.अकोला या शाळेचे शास्त्रीनगर, अकोला, ता.जि.अकोला येथे स्थलांतराबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः माशास्थ ३३१८/प्र.क्र.४७५/एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ३१ जुलै, २०१९

<u>वाचा :-</u>

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांकः माशास्थ २०१२/(५९/१२)माशि-२, दिनांक ३१ जुलै, २०१३.

<u>संदर्भ :-</u> विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती यांचे क्र.एचएससी/३०३३/२०१८, दिनांक ७ मे, २०१८ चे पत्र.

<u>प्रस्तावना :-</u>

माऊली बहुउद्देशिय संस्था, अकोला संचलित माऊली विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, सोमठाणा, ता.जि.अकोला या इंग्रजी माध्यमाच्या स्वयंअर्थसहाय्यित उच्च माध्यमिक शाळेचे, शास्त्रीनगर, अकोला, ता.जि.अकोला येथे स्थलांतरास मान्यता देण्याचा संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय :-</u>

उपरोक्त शाळेचे सध्याच्या अपुऱ्या भौतिक सुविधा असलेल्या इमारतीतून भाडयाच्या प्रशस्त इमारतीमध्ये स्थलांतर प्रस्तावित केले आहे. सदर शाळेचे वर नमूद ठिकाणी केलेल्या स्थलांतरास खालील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे. :-

(१) सदर शाळा स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील शाळा असल्याने स्थलांतरीत ठिकाणी संस्थेच्या नावे किमान १ एकर जागा किंवा तेवढया जागेचा किमान ३० वर्षे कालावधीचा नोंदणीकृत भाडेकरार अथवा सदर ठिकाण मनपा/ अ वर्ग नगरपरिषद क्षेत्रातील असल्यास किमान ५०० चौ.मी. जागा किंवा तेवढया जागेचा किमान ३० वर्षे कालावधीचा नोंदणीकृत भाडेकरार सादर करणे आवश्यक राहील.

(२) स्थलांतरीत शाळेची किमान पटसंख्येची अट कोणत्याही कारणास्तव शिथिल केली जाणार नाही.

(३) शासनाकडून शाळा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/वेतनेतर अनुदान, विद्यार्थी इ.संदर्भात वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ.चे पालन संस्थेने करणे आवश्यक राहील.

(४) शाळेच्या बाबतीत मुळ शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाहीत.

(५) सदर शाळा मुळ ठिकाणी अनुदानाच्या ज्या तत्वावर कार्यरत होती, त्याच तत्वावर स्थलांतरीत ठिकाणी कार्यरत राहील.

(६) सदर शाळा ही इंग्रजी माध्यमाची स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील असल्याने त्यामध्ये कार्यरत शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे संपूर्ण दायित्व संस्थेवर राहील.

(७) सदरहू स्थलांतरासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप आल्यास किंवा स्थलांतरासंदर्भातील अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास स्थलांतर रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. वरील अट क्र. (१) ची पूर्तता झाल्यावर, विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांनी सदर शाळेच्या स्थलांतरास मान्यता देण्याबाबत ६ आठवडयात पुढील कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७३११७३८३६६९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.07.31 17:43:25 +05'30'

(प्रविण मुंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत –

१) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२) विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती
३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अकोला
४) अध्यक्ष/ सचिव, माऊली बहुउद्देशिय संस्था, अकोला
५) निवडनस्ती (एसएम-१).